4 JAN 2019

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठात जलक्रांतीनंतर ऊर्जाक्रांती

## सौरऊर्जेवर प्रायोगित तत्त्वावर वीजनिर्मिती, दोन वर्षांत विद्यापीठ स्वावलंबी

**कोल्हापूर / वैभव गोंधळी :**
शिवाजी विद्यापीठामध्ये पाणी बचत आणि साठवणुकीच्या विविध उपाययोजना करून विद्यापीठास पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्यात आले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाने विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत सौरऊर्जेद्वारे वीजनिर्मिती करण्याचा प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाला असून, येत्या २ वर्षांत विद्यापीठास विजेसंदर्भात स्वावलंबी बनवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर म्हणजे तसा खडकाळ परिसर. या परिसरातील जलस्त्रोत आणि भौगोलिक रचना यांचा अभ्यास करून पाण्याचे योग्य नियोजन केल्याने विद्यापीठ पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण बनले आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ विजेच्या बाबतीतही स्वयंपूर्ण बनावे, यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या छतावर बसवण्यात आलेले सौर पॅनल.**

या प्रयत्नाचा एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातर्फे प्रायोगिक तत्त्वावर सौर ऊर्जेद्वारे वीजनिर्मिती सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये मुख्य प्रशासकीय इमारत आणि केमिस्ट्री अधिविभागाच्या इमारतीच्या छतावर सौर पॅनल बसवण्यात आले. त्यामध्ये मुख्य इमारतीच्या छतावर १०० किलोवॅट, तर केमिस्ट्री अधिविभाग इमारतीच्या छतावर ८० किलोवॅट वीज तयार केली जाते.

त्यासाठी शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अर्थात रुसाकडून निधी देण्यात आला होता. हा प्रकल्प यशस्वीरीत्या सुरू असल्याने विद्यापीठाने आणखी मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. विद्यापीठाची वार्षिक विजेची गरज ही जवळपास ७५० किलोवॅट आहे. सध्या १८० किलोवॅट वीज तयार केली जात असल्याने अद्याप ५७० किलोवॅट वीज वितरण कंपनीकडून खरेदी करावी लागते. विद्यापीठ एकूण ७०० किलोवॅटपर्यंत वीजनिर्मिती करू शकते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने टप्प्याटप्प्याने वीजनिर्मितीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रतिवर्षी किमान ५० किलोवॅट वीज तयार करण्याची योजना हाती घेतली आहे; मात्र या प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेऊन येत्या काळात तातडीने या प्रकल्पासाठी पावले उचलण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. येत्या काळात तंत्रज्ञान अधिविभाग, केमिस्ट्री अधिविभाग तसेच मानव्यशास्त्र विभागाच्या इमारतीच्या छतावर तसेच मोठ्या इमारतींच्या छतावर सौर पॅनल बसवण्यात येणार आहे. सिथेंटिक ट्रॅकच्या परिसरातील १० एकर रिकाम्या जागेवर सौर पॅनल बसवण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे विद्यापीठाची मोठी आर्थिक बचत तर होणारच आहे. अपारंपरिक ऊर्जास्त्रोताचा योग्य वापर करणारे विद्यापीठ म्हणून आणखी एक मानाचा तुरा शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात खोवला जाणार आहे.



### १८० किलोवॅट वीजनिर्मिती

विद्यापीठ पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण झाले आहे. विद्यापीठातील भूजल पातळी वाढवण्यात यश आले आहे. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून विद्यापीठास विजेच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण करण्याचे काम सुरू आहे. यातील १८० किलोवॅट वीजनिर्मिती सध्या सुरू झाली आहे, रुसाकडून मिळालेल्या निधीतून हे काम पूर्ण करण्यात आले आहे. पुढील कामांसाठीही निधी मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आवश्यक शासकीय निधी उपलब्ध न झाल्यास प्राधान्यक्रमाने विद्यापीठाच्या निधीतून हे काम येत्या २ वर्षांत पूर्ण केले जाणार आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू**

सकाळ

# महर्षी शिंदेंचे लेखन अस्सलतेचे प्रतीक

## गोपाळ गुरू; शिवाजी विद्यापीठात पुण्यतिथीनिमित्त परिसंवाद

**कोल्हापूर, ता. ३ :** 'अनुभवशील चिंतनातून संशोधनपर लेखनामध्ये झळकणारा अस्सलपणा हेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या साहित्याचे गुणवैशिष्ट्य आहे; त्यामुळेच अस्पृश्यतेच्या प्रश्नाची अत्यंत मूलभूत आणि वस्तुनिष्ठ मांडणी त्यांनी केली,' असे प्रतिपादन ईपीडब्ल्यू नियतकालिकाचे संपादक डॉ. गोपाळ गुरू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन आणि एन. डी. पाटील प्रतिष्ठानतर्फे महर्षी शिंदे यांची आज पुण्यतिथी साजरी झाली. यानिमित्त 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन आणि कार्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र झाले. यावर डॉ. गुरू बोलत होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या. ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते आणि डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या उपस्थितीत चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले.

डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, ''मायावी अर्थव्यवस्था, कृत्रिम वर्णव्यवस्था आणि दमट ग्रामव्यवस्थेने भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न जटिल केला. उच्चवर्णीयांच्या मनात खोलवर रुतून बसलेली अस्पृश्यतेची मळमळ आहे. ती पूर्ण ओकून टाकल्याशिवाय अस्पृश्यता संपणार नाही असे निरीक्षण महर्षी शिंदे यांनी आपल्या लेखनातून मांडले आहे. अस्पृष्यता वाहती राहण्यामध्ये उच्चवर्णीयांचा स्वार्थ आहे. ती तुंबली, की संपली याची जाणीव असल्याने अस्पृश्यता थांबवली जात नाही. त्यामुळे या साऱ्या व्यवस्थेला महर्षी शिंदे बहिष्कृतांची बंदिशाळा असे संबोधतात. अशी अनेक रूपके महर्षींच्या लेखनात आहेत. त्यांचा अभ्यास व्हायला हवा.''



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. गोपाळ गुरू. शेजारी कृष्णा खोत, डॉ. राजन गवस, डॉ. भारती पाटील, डॉ. नागनाथ कोतापल्ले.

> समाजाला कृतिशील विचार मांडणारी माणसे नको असतात. त्यामुळे महाराष्ट्रात महर्षी शिंदे यांची त्यांच्या हयातीत आणि त्यांच्या उपरान्तही उपेक्षाच झाली. आत्मटीका हासुद्धा महर्षींच्या लेखनाचा एक पैलू आहे.
> – डॉ. गोपाळ गुरू

डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, ''महर्षी शिंदे क्रांतिकारक समाजसुधारक होत. त्यांनी आपली संपूर्ण हयात अस्पृश्यता निवारणासाठी वेचली; मात्र महाराष्ट्राने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा फारसा गांभीर्याने विचार केला नाही.''

डॉ. भारती पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, साहित्यिक कृष्णा खोत यांचा सत्कार डॉ. गोपाळ गुरू यांच्या हस्ते झाला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारत पाटणकर, डॉ. टी. एस. पाटील, मेघा पानसरे, सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा भोसले आदी उपस्थित होते.

4 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# न्यूनगंडाविरोधात पुकारलेले बंड म्हणजेच 'व्यक्तिमत्त्व'

## शिवाजी विद्यापीठातील संगीतशास्त्र व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचा विचार : जागतिक ब्रेल दिनानिमित्त 'तरुण भारत'ने साधला संवाद

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

आपली भाषा ब्रेल आहे म्हणून, खचून न जाता, ध्येयाची आस, कास आणि ध्यास या त्रिसुत्रीचा वापर करून जीवनातील ध्येय साध्य करायला हवे, असे विचार शिवाजी विद्यापीठातील संगीतशास्त्र व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी व्यक्त केले.

न्यूनत्वावर पुकारलेले बंड म्हणजे व्यक्तीमत्व होय.न्यूनत्वाचा बाऊ केला तर घातक आणि मात केली तर व्यक्तिमत्व घडते. म्हणून अंधत्वावर मात करीत हेलन केलर व डेमॉफिनीस यांनी आपले व्यक्तीमत्व घडविले. या विधानाचा संदर्भ देत जन्मत: डॉ. निगवेकर यांनी यश प्राप्तीचा सिद्धांत सांगितला. विद्यार्थी ते संगीतशास्त्र व नाट्यशास्त्र विभागप्रमुख पदापर्यंतचा प्रवास अंधत्वावर मात करीत त्यांनी केलेला प्रवास थक्क करणारा आहे.



कोल्हापूर : लॅपटॉपवर काम करत असाताना डॉ. अंजली निगवेकर.

आज 'जागतिक ब्रेल दिन' या निमित्त 'तरुण भारत' ने संवाद साधला असता डॉ. निगवेकर म्हणाल्या, ब्रेल लिपीची साधने नसताना ब्रेल टाईपरायटरच्या सहाय्याने पीएच. डी. संशोधनासह ज्ञानदानाचे कार्य केले. करवीर तालुक्यातील निगवे गावचे वसंत निगवेकर व सुहासिनी निगवेकर यांच्या त्या कन्या. त्यांचा जन्म ३० डिसेंबर १९६३ मध्ये हुबळी येथे झाला. १९७३ ते ८३ दरम्यान माध्यमिक व उच्च माध्यमिकचे शिक्षण घेत गोकुळदास जोशी यांच्याकडे संगीताचे प्राथमिकसह विशारदपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. मुझिक, इंग्लिश लिट्रेचर आणि फिलॉसॉपी या विषयात त्यांनी पदव्युत्तरचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यापीठातील संगीतशास्त्र व नाट्यशास्त्र विभागात पीएच डी. पदवी पूर्ण केली. शिक्षण घेताना रायटर्स मिळत नसत, त्यामुळे आई–वडीलांच्या सहाय्याने येणाऱ्या अडचणी दूर केल्या. याच काळात त्यांना पंडीत सुधाकरबुवा डीग्रजकर गुरू म्हणून लाभले. डॉ. निगवेकर या २००४, पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून संगीतशास्त्र व नाट्यशास्त्र विभागात कार्यरत आहेत. सतत टापटिप राहणीमान, हसतमुख चेहऱ्यावरील उत्साह डोळस माणसाला लाजवेल असा आहे.

### अचूकतेसाठी ब्रेल टाईपरायटर

ध्येय निश्चित केल्याने काही प्रसंग वगळता आतापर्यंतचा संपूर्ण जीवनप्रवास सूखकर झाला. सध्या जॉज सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संगणक, लॅपटॉप, मोबाईल, मेल, फेसबुकं व वॉटसॲपचा वापर करते. या सर्व आधुनिक साधनांच्या वापराबरोबर अचूकतेसाठी ब्रेल टाईपरायटरचा वापर दररोज करते.

### ब्रेल मशिनव्दारे संवादाची दरी कमी होईल

'ब्रेल मी' या मशीनवर ब्रेल मॅटर इंकप्रिंट होतो व इंकप्रिंट मॅटर ब्रेलमध्ये वाचता येतो. ही मशिन लॅपटॉपला कनेक्ट केल्यास अभ्यास करणे सोपे होवून संवादाची दरी कमी होईल. तसेच अंध लोकांना समाजाने सहानुभुती न दाखवता सढळ हाताने मदत करीत, त्यांच्याशी सुसंवाद साधून त्यांचे विश्व समजून घेतले पाहिजे.

### डॉ. निगवेकर यांना मिळालेले पुरस्कार

- १९९५: उत्कृष्ट नियोजनासाठी निलम कांगा पुरस्कार
- २००६: वर्ल्ड फिल्म फेस्टीव्हल निर्धार पुरस्कार
- २००९: सांगलीतील अपंग सेवा केंद्रातर्फे जिद्द पुरस्कार
- २०१३ : नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लॉईंड बेस्ट प्रोफेसर पुरस्कार
- २०१५ : शिवाजी विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलचा 'शिवगौरव' पुरस्कार

विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# अज्ञानेश्वर की विज्ञानेश्वर





'एकविसावे शतक हे विज्ञानयुग असेल,' असे म्हणत एकविसावे शतक आले. त्यातील दोन दशके संपतसुद्धा आली. यापूर्वी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी भारतवासीयांना आधुनिक, सशक्त, सामर्थ्यशाली भारताचे स्वप्न दाखविले. आम्ही ते मनावर घेतले. सर्वांना वाटू लागले भारत महासत्ता बनणार. ते स्वप्न एका वास्तवावर आधारित होते. देशातील लोकसंख्येत या कालखंडात तरुणांची संख्या सर्वाधिक असणार. तरुण म्हणजे नवचैतन्याचा झरा. 'नवे ते हवे' म्हणत, स्वप्नांच्या मागे पळणारा. सर्वस्व पणाला लावणारा. तरुणाईने मनावर घेतले तर भारताला महासत्ता बनण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही. मात्र, आपण त्या दिशेने जात आहोत का?

हा प्रश्न पडण्याचे कारण, नुकतीच 'लोकमत'मध्ये बातमी आली. मेळघाटातील चाकर्दा गावखेड्यात एका वृद्धाच्या जखमेत अळ्या झाल्या. ही बातमी बाहेर समजली. या घटनेमुळे गावाने त्या दिवशी उपवास केला. झाले असे की, त्या गावातील एका वृद्धाच्या पायाला दुचाकीचा सायलेन्सर भाजला. त्या वृद्धाला मधुमेह आहे. जखम भरून येत नव्हती. त्याच्या जखमेत अळ्या झाल्या. जर कोणाच्या जखमेत अळ्या झाल्या, तर म्हणे गावात वाघ येतो. या वृद्धाच्या जखमेत अळ्या पडल्याची बातमी पसरली आणि गावात पेटलेल्या चुली विझविण्यात आल्या. त्या वृद्धाला तेथील पुजाऱ्याने गावाबाहेर नेले. नदीकाठी पूजा आणि विधी केले. जखमींवर उपचार केले. अळ्या बाहेर काढल्या. त्या व्यक्तीला कोपऱ्यात खड्डा खोदून त्यावर बसविले. तेथे अग्नी पेटविला. 'भागो रे भागो, तेरा घर जल रहा है' असे म्हणताच, ती व्यक्ती तेथून बाहेर पडली. त्यानंतर गावातील चुली पेटल्या. तोपर्यंत अख्खा गाव उपाशी होता. ही बातमी वाचून प्रश्न पडला, खरंच आपण महासत्ता बनणार का? आजपर्यंत ज्या राष्ट्रांनी जगाचे नेतृत्व केले, त्या राष्ट्रांबाबत दोन गोष्टी समान आहेत. एक म्हणजे या राष्ट्रांनी त्यापूर्वी सर्वसमावेशकता जपली होती. दुसरे त्या राष्ट्रांनी विज्ञानाची कास पकडली होती. आपण पहिल्या गोष्टीमध्ये कोठे आहोत? यावर भाष्य करणार नाही. मात्र विज्ञानाची कास आपण खरंच पकडली आहे का? याचा विचार जरूर करणार आहोत.

विज्ञान आणि शास्त्र यांत एक साम्य आहे ते म्हणजे हे नियमाला धरून असते. शास्त्र म्हणजे एखाद्या विषयाची नियमाला धरून मांडणी करणे. हे नियम स्थल, कालसापेक्ष असू शकतात. अनेकदा व्यक्तिसापेक्षही असतात. यामुळे भाषाशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र सारे काही शास्त्र बनते. विज्ञानाचे मात्र तसे नाही. विज्ञानाची मांडणी नियमावरच असते. मात्र, हे नियम स्थल, काल, व्यक्तिसापेक्ष नसतात. यातून केवळ विज्ञानशास्त्र राहते. फिजिक्स त्यामुळेच मराठीमध्ये पदार्थविज्ञानशास्त्र बनते. ते निखळ सत्य असते. हे सत्य जाणून घेण्याचा हक्क सर्वांना आहे. मात्र, तो अनेक कारणांनी आपल्यापर्यंत पोहोचत नाही. काहीवेळा पोहोचू दिला जात नाही. सर्वसामान्य माणसे त्याचा शोध घेऊ शकत नाहीत. त्यांच्याजवळ इतका वेळही असत नाही. त्यामुळे तो सत्यापर्यंत पोहोचत नाही. अशा सर्वसामान्य वैज्ञानिक विचारसरणी नसणाऱ्या लोकांना मग अवैज्ञानिक गोष्टींनी भारावून टाकत, वैज्ञानिक प्रयोगांना चमत्कार म्हणून सांगत फसवले जाते. त्यातून पुढे अंधश्रद्धा निर्माण होतात. असा अंधश्रद्ध समाज कर्मकांडात रुतून बसतो आणि त्याची क्रयशक्ती राष्ट्रबांधणीसाठी वापरली जात नाही. त्यातून चाकर्दासारख्या घटना घडतात. जखमीला डॉक्टरकडून नव्हे पुजाऱ्याकडून उपाय होतात. एकीकडे आपण अवकाशात माणूस पाठवणारा चवथा देश बनणार आहोत. तर दुसरीकडे चाकर्दा. म्हणून सामर्थ्यशाली भारत बनवण्यासाठी आपण अज्ञानेश्वर न राहता, विज्ञानाची कास पकडत विज्ञानेश्वर व्हायला हवे.

**(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)**